(इ.स. १८५० ते १९५०)

● **महात्मा जोतीराव फुले :-** ( जन्म २० फेब्रुवारी इ.स.१८२७ मृत्यू २० डिसेंबर इ.स.१८९० )

त्याच्या जन्म एका श्रीमत माळी कुटुंबात २० फेब्रुवारी १८२७ रोजी झाला. जोतीरावांचे मूळ घराणे साताऱ्याजवळील कटगुण हे होय. त्याकाळी ब्राम्हणेतरांना शिक्षण घेता येत नसे. तरीही त्याच्या वडिलांची त्यांनी शिक्षण घ्यावे अशी इच्छा होती. सनातन्यांनी त्यांच्या वडिलांवर दबाव आण्याने त्यांचे शिक्षण बंद पडले. विवाहानंतर त्यानी परत शिक्षणास सुरुवात केली. आणि त्यामुळे देश बांधवांचा उध्दार करण्याच्या कल्पनेने त्याच्या मनात मूळ धरले.

पेशवाईच्या काळामध्ये जातिभेद पराकोटीला पोहोचला होता. आणि हाच वारसा पुढे पेशवाई नष्ट झाल्यानंतर ब्राम्हण समाजाने चालविला होता. अस्पशृश्यांची स्थिती गुलामासारखी होती. मनुस्मृतीसारख्या ग्रंथामध्ये स्त्रियांना हीन लेखल्यामुळळे भारतातील स्त्री समाजाची अत्यंत अवहेलना झाली.

त्या काळात स्त्रियांचे शिक्षण हे पाप व रुढी विरोधी समजले जात असत. जोतीरावांनी स्त्री-सुधारणा हे समाज -सुधारेणेचे मुळे आहे हे ओळखले. तयसाठी शिक्षिका मिळाली नाही तेव्हा स्वत:च्या पत्नीस शिक्षण देऊन त्यांनी तिला शिक्षक म्हणून बनविले. यासाठी त्यांना प्रखर समाज विरोधास तोंड द्यावे लागले. जोतीरावांचे हे स्त्री शिक्षणाचे कार्य युगप्रवर्तकच होते.

अस्पश्योध्दराच्या कार्याची सुरुवात अस्पृश्य मुलांसाठी पहिली शाळा काढली आणि अस्पृश्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले केले. कारण शतकानुशतके चालत आलेल्या गुलामगिरीतून अस्पृश्यांना बाहेर काढ्यासाठी शिक्षण हाच एकमेव उपाय आहे, असे त्यांचे मत होते. अस्पृश्यतेची खोलवर रुजलेली मुळे नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हरिजनांना सार्वजनिक जागेतही प्रवेश दिला जात नसे.

इ.स. १८७३ मध्ये त्यांना अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी जाहिरनामा प्रसिध्द केला. इ.स.१८७६ ते७७ भयानक दुष्काळाला वाचा फोडण्यसाठी शेतकऱ्यांस एकत्रित करुन त्यांनी एक बंड केले. खतफोडीचे बंड या नावाने ते प्रसिध्द झाले.शेतकऱ्यांचे दारिद्रय व अज्ञान नष्ट करण्याची त्यांना अतिशय तळमळ होती.

अस्पृश्यांच्या शिक्षणाबरोबरच सर्वच पददलित आणि शेतकरी कामगार यांच्या शिक्षणासाठी कष्ट केले. अज्ञान नाहीसे करण्यासाठी आणि सद्गुणांची वाढ करण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे असे सांगून जोतीरावांनी यासाठी अविरत कष्ट उपसले.

जोतीराव हे महार-मागांनी अस्पृश्य गणल्या गेलेल्या पददलितांचे पहिले उध्दारक, पाच हजार वर्षाच्या भारताच्या इतिहासात मुलींसाठी शाळा स्थापन करणारे पहिले भारतीय म्हणून स्त्री शिक्षणाचे जनक, स्त्री, शेतकरी, कामगार, अस्पृश्य यांच्या उध्दारासाठी पहिली

Scanned with OKEN Scanner

चळवळ उभारणारे लोकनेते होते. जोतीरावांचा गौरव महात्मा गांधींनी खरा महात्मा म्हणून केला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांना समाज क्रांतिकारक म्हणून संबोधले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना बुध्द आणि कबीर यांच्या बरोबर गुरुत्वाची पदवी अर्पण केली. त्यातच त्यांची थोरवी दिसून येते.

जोतीराव फुले यांचा जन्म इ.स.१८२७ साली झाला. गोविंदराव व चिमणाबाई या दांपत्याने त्यांचे नाव जोतीराव ठेवले. मिशनऱ्यांच्या शाळेत सेवा, समानता, स्वार्थत्याग, परोपकार, महानता हे गुण त्यांच्या रोमारोमात भिनले. परंतु मिशनऱ्यांच्या विटाळाच्या भितीने अक्षर ओळख व हिशोब शिकण्यापर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्यांची शाळा बंद करण्यात आली. त्यानंतर गफर बेग मुन्शी या धर्मापदेशकाने इ.स. १८४१ मध्ये जोतीरावांना स्कॉटिश मिशनच्या शाळेत घातले. तेथे गांवडे या ब्राम्हण मित्राच्या सहवासात शिवाजी व वॉशिंग्टन यांची चरित्रे आणि राईटस् ऑफ मॅन या थॉमस पेन यांच्या ग्रंथाचा त्यांच्यावर परिणाम झाला.

विद्यार्थी दशेत केलेल्या या अभ्यासामुळे हिंदू धर्मातील रुढी, सामाजिक विषमता, ढोंगीपणा, शैथिल्याची व बुरसटलेल्या विचारांची जळमट झटकून टाकण्याची विचारक्रांती करण्याचे त्यांनी ठरविले. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचा सावित्रीबाईशी विवाह झाला. जोतीरवाने इ.स. १८४७ मध्ये आपले इंग्रजी शिक्षण संपवले. ब्रिअीश सत्तेविरुध्द झालेल्या बंडात अनेक देशभक्त हसत फासावर चढत असत्यापासून त्यांना प्रोत्साहन मिळत असे भारतासारख्या खंडप्राय देशावंर मुठभर ब्रिटीशांचे राज्य असल्यामुळे आपण पारतंत्र्यात आहेत , भारतमातेला परकीय जोखडातून सोडविण्याचा व देशाला स्वतंत्र व बलवान बनवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशी त्यांची सुरुवातीच्या काळात भावना होती.

- **सामाजिक अप्रतिष्ठा :-** स्वातंत्र व लोककल्याण यांचा विचार करीत असताना जोतीरावांच्या जीवनात एक महत्त्वाची घटना घडली. जोतीराव आपल्या एका ब्राम्हण मित्राच्या लग्नाला गेले असता, वरातीमध्ये ब्राम्हणांनी त्यांचा शुद्र म्हणून अपमान केला व त्यांना वरातीत मागून यायला सांगितले. तेव्हापासून सामाजिक विषमतेबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण झाली. सर्व परिस्थितीच्या विचाराअंती ब्राम्हणांचे वर्चस्व व प्रभुत्व यांचे मूळ कशात आहे, शूद्र अनेक शतके मानसिक गुलामगिरी व दारिद्र कसे भोगत आहेत हे त्याच्या लक्षात आले. सामाजिक असमतेसाठी संघर्ष केला पाहिजे असा त्यांना निर्धार केला व आपल्या कार्याची दिशा ठरवली. सामाजिक अप्रतिष्ठेचा हा कलंक त्यांच्या पुढील आयुष्याचे उगम स्थान ठरले. पुढे या वैयक्तिक अपमानाचे रुपांतर विशाल ध्येयशक्तीत केले.
- **शैक्षणिक कार्याची सुरुवात :-** अज्ञानरुपी अंध:काराला दूर करण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे शस्त्र नाही. शिक्षणाने मनुष्याला सत्य, असत्याचा व अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ती प्राप्त होते. शिक्षण हे सुधारणेचे मूळ आहे. त्यातून स्वाभिमानाची जाणीव जागृत होते, हे जोतीरवांनी ताडले होते. त्यातल्यात्यात स्त्रियांना शिक्षण म्हणजे पुढील पिढीला शिक्षण असे जोतीरावांचे मत होते. एक सुशिक्षित स्त्री आपल्या मुलांना


Scanned with OKEN Scanner

कधीच अशिक्षित राहू देणार नाही. त्याकाळात स्त्री ही परतंत्र, अबला समजली जाई.. शिक्षणामुळे ती कुमार्गास लागेल, दुष्ट, चंचल, अविचारी, स्वैर वृत्तीची होईल असे विचार समाजात रुढी होते.

परंतु जोतीरवांनी निर्भयपणे स्त्रीशिक्षणाचा वसा उचलला. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगास उध्दारी हे त्यांनी ओळखले . पेशवाई जाऊन इंग्रजांची राजवट आली तरीही लोकांवर पेशवाईचा प्रभाव होता. पुण्यात स्थियांच्या शिक्षणाची अजिबात सोय नव्हती. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी इ.स. १८४८ मध्ये मुलींची पहिली शाळा सुरु केली. अस्पृश्यांच्या मुलींनाही शिकवण्यसाठी सावित्रीबाई हिला शिक्षण देऊन तेथे शिक्षका म्हणून नेमले. वाचन, अंकगणित, व्याकरणाची मूलतत्वे या शाळेत शिकविली जात. सावित्रीबाईना शाळेत जाताना अनेक हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले. परंतु त्या आपल्या कार्यात मग्न होत्या. सनातनी लोकांना त्या म्हणत मी आपले कर्तव्य करीन, देव तुम्हास क्षमा करो. सावित्रीबाईचा शिक्षणात प्रवेश झाल्यापासून हिंदू स्त्री सार्वजनिक क्षेत्रात उतरली. परंतु सनातनी लोकांनी जोतीरावांच्या वडिलांवर, गोविंदरावांवर शाळा सुरु केल्यामुळे बहिष्कृत करु असा दबाव आणला. त्यामुळे गोविंदरावांनी जोतीरावांना घराबाहेर घालवले. दरम्यानच्या काळात आर्थिक स्थिती बिघडल्यामुळे काही दिवस शाळा बंद ठेवावी लागली. पुन्हा आर्थिक स्थिती सुधारल्यावर त्यांनी जुनागंज पेठेत शाळा उघडली. मॅजन कंडी हे या शाळेला पुस्तके पुरवित. ३ जुलै इ.स.१८५१ ला ही शाळा चिपळूणकरांच्या वाड्यात नेण्यात आली. त्यात मुलींची संख्या ४८ होती. सावित्रीबाई त्यात मुख्याध्यापिकेचे काम पहात पुढे १७ सप्टेबर १८५१ मध्ये रास्तापेठेत त्यांनी मुलींची चौथी शाळा काढली. त्यापूर्वी त्याचवर्षी मध्ये बुधवारपेठेत दुसरी शाळा सुरु झाली. ज्योतीरावाच्या शाळांच्या बाबतीत पुना ऑब्झर्व्हर या पत्राने असे मत व्यक्त केले की, जोतीरावाच्या शाळेतील मुलांची पटसंख्या सरकारी शाळेतील पटसंख्येपक्षा दहा पटीने मोठी आहे. यावरून जोतीरावांच्या शाळेतील शिक्षणाचा दर्जा खूप चांगला होतो हे दिसून येते ज्ञानप्रकाश या वृत्तपत्राच्या अंकात असे व्यक्त केले आहे की सर्व जातीच्या मुलांस जोतीराव फुले फार मेहनत करून लिहीणे वाचणे, शिकवत आहेत. या स्तुत्य कामाच्या सन्मानार्थ सरकारने एक शालजोडी देण्याचा हुकूम केला आहे व ती शालजोडी बोर्डामार्फ त कचेरीतून सरहू गृहस्थास देण्यात येणार आहे. जोतीरावाच्या शैक्षणिक कार्यास सरकारनेही आर्थिक मदत केली. परंतु रुढीप्रिय शास्त्री मंडळींनी कट करुन ज्योतीरावावर मारेकरी घातले परंतु पुढे हेच मारेकरी त्यांचे शिष्य झाले. पेशवाई बुडल्यावर ब्रिटीशांनी ब्राम्हणांना देण्यात येणारी दक्षिणा बंद केली व त्याचा दक्षिणा फंड बनविला. त्यातील पैसा स्त्रीशिक्षण उपक्रमाबद्दल सहाय्य म्हणून विश्रामबाग येथे सत्कार करून त्यांना देण्यात आला. स्त्री शिक्षणाला त्यांनी एक वेगळी दिशा दाखवून स्त्रीजीवन सुधारणस प्रारंभ केला.

- **जोतीरावांनी केलेले स्त्रीसुधारणेचे कार्य :-** त्याकाळी स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती.

Scanned with OKEN Scanner

... होता. या स्त्रिया विषयवासनेपोटी अनैतिक मार्गाचा अवलंब करीत. अनौरस संततीच्या भीतीने भुणहत्या केली जाई. केशवपन सारख्या चाली रुढी होत्या. अशावेळी जोतीरावांनी स्त्री उध्दाराचे कार्य हाती घेतले.

- **पुनर्विवाह व बालहत्या प्रतिबंधक गृह :-** उच्च वर्णीय समाजात विधवा स्त्रियांचे हाल पाहून त्यांचे मन द्रवले. म्हणूनच त्यांनी भाषणातून व लिखाणातून पुनर्विवाहाचा धडाडीने प्रसार केला. इ.स. १८६४ मध्ये शेणवी जातीत एक पुनर्विवाह जातीरावांनी घडवून आणला. त्यावेळी समाजात बालविवाह रुढ होता. शिवाय पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला वैधव्यात रहावे लागे. मात्र पत्नी मेली तर पतीला दुसरे लग्न करण्याची परवानगी दिली होती. विधवास्त्रियांना लैंगिक भावना व अपत्यप्रेम यापासून वंचित रहावे लागे. अशा स्थिया काही वेळा पुरुषांच्या वासनेला बळी पडत व नवीन जन्माला येणाऱ्या अर्भकाची हत्या करत. यासाठी जोतीरावांनी इ.स.१८६४ मध्ये आपल्या राहत्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले व पुण्यामध्ये जाहितीची पत्रक लावली. या पत्रकात लिहिले होते की विधवाने इथे येऊन गुप्तपणे व सुरक्षितपणे व बाळात व्हा, तुम्ही आपले मूल न्यावे किंवा येथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. त्या मुलाची काळजी हा अनाथ आश्रम घेइल. याच आश्रमात काशीबाई नावाच्या ब्राम्हण विधवेस मुलगा झाला. त्याचे नाव यशवंत ठेवून पुढे त्याला जोतीरावांनी दत्तक घेतले. जोतीरावांनी सुरु केलेली ही भारतातील पहिलीच संस्था होय. त्यावेळी मृत पतीबरोबर सती जाण्याची प्रथा अस्तित्वात होती. विधवेने केशवपन करून आपले आयुष्य ब्रम्हचर्य अवस्थेत कठावे अशी सक्ती होती. या रुढीविरुध्द त्यांनी चळवळ उभी केली. बहुपत्नीकत्वाला त्यांचा विरोध होता.

- **अस्पृश्यासांठी केलेले कार्य :-** जोतीरावांचा असा विश्वास होता की, जातीव्यवस्थेमुळे समाजामध्ये उच्च नीच भेद दिवसेदिंवस वाढत आहेत. उच्च वर्गाची प्रगती उत्तरोतर चांगली होत आहे व अस्पृश्यास समाजात कोणतेही स्थान नाही. सकाळ संध्याकाळ त्यांना गावात फिरायची परवानगी नसे. गळ्यात मडके व कमरेला खूराटा बांधुन गावात येण्यास परवानगी होती. इ.स.१८५२ मध्ये अस्पृश्यासांठी वेताळपेठेत त्यांनी स्वखर्चाने एक शाळा सुरु केली. इ.स. १८५३ साली आपल्या मित्राच्या सहाय्याने त्यांनी महार मांग इत्यादी लोकांना विद्या शिकविण्याकरिता मंडळी नावाची संस्था स्थापन केली. लहूजी मांग, राजबा महार यासारख्या अस्पृश्य लोकांना हाताशी घेऊन शुद्र समाजात शिक्षणाची गोडी निर्माण केली. इ.स.१८६८ मध्ये जोतीरावांनी आपल्या घराजवळच्या पाण्याचा हौद अस्पृश्यासाठी खुला केला. सार्वजनिक ठिकाणी मंदिरे, तलाव, विहीरी, शाळा इ. मध्ये अस्पृश्यांना प्रवेश नव्हता, घाणेरड्या स्वरुपाची परंतु आवश्यक अशी कामे अस्पृशांनी केली पाहिजेत अशी समाजाची सक्ती होती. सर्वांकडून उपेक्षिल्या गेलेल्या समाजाची सुधारणा करण्यासाठी जोतीरावानी त्यांच्य त शिक्षणाव्दारे सुधारणा घडवून आणण्याचा निर्धार केला. वडिलांच्या

Scanned with OKEN Scanner

टीका करून उदारमतावादाचा पुरस्कार केला. ...
स्वामी दयानंद यांना उदारमतवादी सनातनी म्हणून संबोधले आहे. बिपिनचंद पाल म्हणतात, "हिंदू समाजात धार्मिक व सामाजिक जागृती करून त्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे श्रेय आर्य समाजाला आहे."

इंग्लंडमधील `Times' या वृत्तपत्राचा प्रतिनिधी व्हॅलेन्टाईन चिरोल याने म्हटले होते, "आर्य समाज हा इंग्लंड व त्याचे सार्वभौमत्व यास सर्वात गंभीर धोका आहे." स्वत: दयानंदांनी प्रार्थना समाज व ब्राह्मो समाज यावर टीका केली आहे. ते म्हणत, "या दोन्ही समाजाच्या लोकांनी आपल्या पूर्वजांचा पूर्वापार धर्म सोडून दिला असून पाश्चात्त्यांची भ्रष्ट नक्कल ते करीत आहेत."

**सत्यशोधक समाज -**

**प्रास्ताविक** - १९ व्या शतकातील भारताच्या समाजक्रांतीचे जनक, एक श्रेष्ठ समाजसुधारक व समाजचिंतक म्हणून म. जोतिराव फुले ओळखले जातात. आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे ते आद्य प्रवर्तक होत. १९ व्या शतकात महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, भांडारकर, न्या. रानडे, विष्णुशास्त्री पंडित, आगरकर इ. समाजसुधारक होऊन गेले. पण ते या सर्वांच्या कार्याची दिशा, व्याप्ती उच्चवर्णीयांच्या कौटुंबिक सुधारणा (प्रामुख्याने स्त्री

Scanned with OKEN Scanner

दास्यविमोचन) यापलीकडे गेली नाही. म. फुले यांचे कार्य, विचारांची व्याप्ती व दिशा वेगळी होती. दलित व कनिष्ठ वर्गाकडून 'महात्मा' ही पदवी मिळवणारे म. फुले हे पाहिलेच महापुरुष आहेत. गोवर्धन पारीख यांच्या मते, "१९ व्या शतकातील विचारवंतांत व दृष्ट्यात अग्रपूजेचा मान ज्योतिरावांना द्यावा लागेल. बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना 'हिंदुस्थानचे बुकर-टी-वॉशिंग्टन म्हटले होते, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध-कबीर यांच्यासोबतच म. फुले यांना आपले गुरू मानले होते. माधवराव बागल यांच्या मते, "कार्ल मार्क्सच्याही अगोदर समतेची दृष्टी फुल्यांनी महाराष्ट्राला दिली."

१८२७ साली म. फुले यांचा जन्म क्षत्रिय माळी कुटुंबात झाला. सातारा जिल्ह्यातील कडगुण ही त्यांच्या पूर्वजांची मायभूमी. पुण्यास फुलांच्या व्यवसायात नावलौकिक मिळवल्याने त्यांच्या कुटुंबास फुले हे नाव पडले. म. फुले यांना समाजकार्याची आवड निर्माण झाली. तरुण वयात त्यांनी सामाजिक प्रश्नावर समाजिक व्यवस्था (Social System) यावर चिंतन केले. यास प्रामुख्याने त्यांच्यावर तरुण वयात झालेले संस्कार, त्यांनी केलेले ग्रंथपालन व त्यांना आलेले अनुभव कारणीभूत होते.

१) लहानपणापासून कष्टकऱ्यांची हलाखीशी स्थिती त्यांनी पाहिली होती.

२) ख्रिस्तप्रणीत मानवतावादाची त्यांना ओळख झाली होती. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या कार्यपद्धतीचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता.

३) ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या वरातीत शूद्र म्हणून त्यांची हेटाळणी केली गेली.

४) थॉमस पेन यांचे ग्रंथ व विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता.

**म. फुले यांची ग्रंथसंपदा -**

म. फुले यांनी विपुल ग्रंथनिर्मिती केली. त्यांचे सर्व ग्रंथ एकत्रितपणे 'म. फुले समग्र वाङ्मय' या शीर्षकाखाली महाराष्ट्र सरकारने प्रकाशित केले होते. म. फुले यांनी पुढील ग्रंथ लिहिले.

१) छत्रपती शिवाजीराजे यांचा पोवाडा

२) गुलामगिरी

३) ब्राह्मणाचे कसब

४) शेतकऱ्याचा आसूड

५) सत्सार भाग १, २

६) सत्यशोधक समाजोक्त मंगळाष्टकासह सर्व पूजाविधी

७) सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक

८) अखंडादि काव्यरचना

९) तृतीय रत्न (नाटक)

१०) हंटर कमिशनला सादर केलेले निवेदन.

Scanned with OKEN Scanner

## म. फुले यांनी केलेले सामाजिक कार्य -

१) स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता व्हावी यासाठी १८४८ मध्ये पुण्यास मुलींची पहिली शाळा काढली.

२) शूद्रातिशूद्रांच्या मुलांसाठी त्यांनी पुण्यात एकूण ३ शाळा काढल्या.

३) स्वत:च्या मालकीची विहीर अस्पृश्यांना पाणी पिण्यासाठी मोकळी करून दिली.

४) विधवा स्त्रियांच्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृह चालवले.

५) विधवा स्त्रियांचे लग्न लावून दिले.

६) बालविवाह, बहुपत्नीत्वाची पद्धत, सतीप्रथा यावर त्यांनी कठोर टीका केली.

७) समुद्रपर्यटन केल्याने धर्म बुडतो या प्रथेवर त्यांनी टीका केली. परदेशगमन न केल्यामुळे पाश्चात्त्य ज्ञान, विज्ञान, इतिहास, भूगोल, उद्योग, व्यापार इ.ची आपणास ओळख झाली असे त्यांनी म्हटले.

८) विधवा स्त्रियांचे केशवपण करू नये असा प्रसार करून मुबईस न्हाव्याच्या परिषदेत केशवपण न करण्याचा ठराव पास करून घेतला.

९) मद्यपानास विरोध दर्शविणारे पत्र पुणे नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाकडे पाठविले. त्यात मद्यपानामुळे लोकांचा नैतिक अध:पात होतो, सर्वनाश होतो असे म्हटले.

१०) भिक्षुकशाही, नोकरशाही व सावकारशाही यांच्यावर त्यांनी कठोर हल्ला केला व या तीन घटकांकडून शूद्र व अतिशूद्रांचे शोषण कसे होते याची विस्तृत सूक्ष्म मीमांसा त्यांनी लिखाणात केली.

११) १८८२ मध्ये हंटर कमिशनला त्यानी एक निवेदन सादर केले व त्यात त्यांनी खालील सूचना ब्रिटिश सरकारला केल्या होत्या.

१) प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे.

२) शूद्र व अतिशूद्र वर्गातील विद्यार्थी शिकावेत म्हणून सरकारने शिकवण्या घ्याव्यात.

३) शिक्षकांचे वेतन वाढवावे.

४) शिक्षक प्रशिक्षित असावेत व ते शेतकरी वर्गातील असावेत.

५) अभ्यासक्रमात लेखन, वाचन, इतिहास, भूगोल, व्याकरण, हिशेब, नीती, आरोग्य इ. चा समावेश असावा.

६) प्राथमिक शाळांची तपासणी दर ३ महिन्याला व्हावी.

७) स्थानिक स्वराज्य संस्थांनी निम्मा निधी शिक्षणावर खर्च करावा.

८) सर्व पातळीवरची शिक्षणयंत्रणा सरकारी नियंत्रणाखाली असावी.

९) व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणावर भर द्यावा.

Scanned with OKEN Scanner

१०) केंद्रीय व प्रांतीय निधीतून शाळांना अनुदान मिळावे.

११) स्वत: फुले निपुत्रिक होते. पण त्यांनी पुनर्विवाह न करता काशीबाई नावाच्या विधवेस झालेला पुत्र दत्तक घेतला.

**सत्यशोधक समाज**

४ सप्टेंबर १८७३ रोजी म. फुले यांनी त्यांचे चाहते व अनुयायी यांची सभा घेऊन सत्यशोधक समाजाची स्थापना पुणे येथे केली. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील ही महत्त्वाची घटना आहे. मराठी प्रदेशात ग्रामीण व अज्ञानी जनतेपर्यंत पोहोचलेली ही पहिलीच चळवळ होय. फुले यांच्या मत्यूनंतर १९११साली सत्यशोधक समाजाचे जे पहिले अधिवेशन पुणे शहरात भरले त्यात सत्यशोधक समाजाची तत्त्वे सांगितली होती.

१) सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत.

२) आईला किंवा वडिलांना भेटण्यासाठी, प्रसन्न करण्यासाठी ज्याप्रमाणे मध्यस्थाची आवश्यकता नाही त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यासाठी पुरोहित किंवा गुरुची गरज नाही.

३) मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नाही तर गुणांनी ठरतो.

४) कोणताही ग्रंथ प्रमाण किंवा ईश्वरनिर्मित नाही.

सत्यशोधक समाजाच्या आपल्या अनुयायांसाठी त्यांच्या मार्गदर्शनासाठी म. फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' हा ग्रंथ लिहिला होता. वि. रा. शिंदे यांच्या मते हे पुस्तक सत्यशोधक समाजाचे बायबल होते. या ग्रंथातील फुले यांचे विचार हे सत्यशोधक समाज व चळवळ याचा मुख्य आधार होत. या ग्रंथात सत्यशोधक समाजाची तत्त्वेही सांगितली होती.

१) ईश्वर म्हणजे 'निर्मिक' हा एकच आहे तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकारी आहे त्याने प्राणिमात्राच्या उपभोगासाठी विविध वस्तू तयार केल्या आहेत.

२) 'एक ईश्वर एक धर्म' या तत्त्वाचा फुले यांनी पुरस्कार केला होता. ते म्हणत, "मानवाचे धर्म नसावे अनेक। निर्मिक तो एक। ज्योती म्हणे।। कोणास न पिडी। कमावले खाई। सर्वा सुखा देई। आनंदात।।.
खरी हीच नीती। मानवाचा धर्म। बाकीचे अधर्म। ज्योती म्हणे।।"

३) दगड किंवा धातूच्या मूर्तीची पूजा करणे हा ईश्वरसाधनेचा मार्ग साफ चुकीचा आहे. परमेश्वरांची विविध रूपे कल्पून भजन-पूजन, कीर्तन करू नये.

४) 'निर्मिक' हा सर्वार्थाने परिपूर्ण आहे. त्याला कशाचीही गरज नाही. नेवैद्य अन्नदानाची त्यास गरज नाही. सर्व माणसे ही परमेश्वराची लेकरे आहेत.

Scanned with OKEN Scanner